## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २३ ऑगस्ट २०१६.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मत्स्यआ. २०१३/प्र.क्र. २१८/पदुम-१२.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि यापूर्वी या संबंधित अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवेतील " सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी ", गट-क (तांत्रिक) (अराजपत्रित) या पदाच्या सेवाभरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी ", गट-क (तांत्रिक) (अराजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०१६ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " आयुक्तालय " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालय ;

(ब) " पदवी " याचा अर्थ सांविधीक विद्यापीठाची पदवी ;

(क) " विभाग " याचा अर्थ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

३. " सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी " या पदावरील नेमणुका खाली नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येतील :—

(अ) ज्यांचे वय अडतीस वर्षांपेक्षा जास्त नाही ;

(ब) ज्यांनी मत्स्यविज्ञान विषयातील पदवी (B.F.Sc.) किमान द्वितीय श्रेणी धारणा केली आहे.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर राहील. परिवीक्षा कालावधी कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. पदावर नियुक्त व्यक्तीने परिवीक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याने विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा तो सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास, त्याची सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने याबाबत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसल्यास किंवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास, त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी संबंधिचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चि. नि. सुर्यवंशी,**
शासनाचे सह सचिव (मत्स्य).

Scanned with CamScanner